वार्षिक योजना २०१५-१६

कालमर्यादित


**महाराष्ट्र शासन**

**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**

**महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१.**

Web : wwwdhepune.gov..in E-mail : dhepune@yahoo.co.in

फोन नं. ०२०/२६१२२११९, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं. ०२०/२६११११५३


क्र. अर्थसं -२०१४ (०३९/१४)वायो १५-१६/ लेखा -२ ७६०१ दि.६ सप्टेबर २०१४

प्रति,

शिक्षण संचालनालय उच्च शिक्षण यांच्या अखत्यारितील
सर्व प्राचार्य / संचालक /कार्यालय प्रमुख
शासकीय महाविद्यालये / संस्था / वसतिगृहे
प्रि.आय.ए.एस. ट्रेनिंग सेंटर्स
सर्व विभागीय सहसचालक ( उच्च शिक्षण )

**विषय- वार्षिक योजना २०१५-१६ ची आखणी करणे**
प्रशासकीय विभागाबरोबर चर्चा

संदर्भ - शासन पत्र क्र.सकीर्ण २०१४/ २१७/१४/ म वि ३ दि ३० ऑगस्ट २०१४

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, वार्षिक योजना सन २०१५-१६ चा प्रारुप आराखडा योजना नियोजन आयोगाला मान्यतेसाठी सादर करावयाचा आहे. त्यासाठी वार्षिक योजना २०१५-१६ च्या आखणीची सुरुवात करणेबाबत नियोजन विभागाने मंत्रालयीन विभागास सूचित केलेले आहे. वार्षिक योजना २०१५-१६ तयार करताना विभागाने क्षेत्र /उपक्षेत्र विचारात घेऊन त्याखाली येणा-या योजनासाठी निधी मागणी करणे अपेक्षित आहे.

सन २०१५-१६ मध्ये आपले महाविद्यालय / संस्थामध्ये कोणती कामे प्रस्तावित करणार आहेत. यांची माहिती खालील विवरणपत्रामध्ये **दि. १५ सप्टेबर २०१४** पर्यत निश्चितपणे दोन प्रतीत सादर करावी .

**विवरणपत्र**

महाविद्यालय /संस्था / कार्यालयाचे नाव

कार्यालयाचा ई मेल आय-डी

| अ. क्र. | वर्ष | आवश्यक असलेला नियतव्यय | | भांडवली कामामधील प्रस्तावित बांधकामे | बिगर भांडवली नियतव्ययामधून वर्षात खरेदी करण्यात येणा-या बाबी /वस्तू (संपुर्ण तपशीलासह ) | वस्तूंची / बाबीची अंदाजित किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २०१५-१६ | भाडंवली | बिगर भांडवली | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

उपरोक्त विवरणपत्रामध्ये माहिती नमुद करताना खालील बाबी विचारात घ्याव्यात

१. वार्षिक योजना सन २०१५-१६ साठी आपले महाविद्यालय संस्था यांच्यासाठी जी तरतूद आवश्यक आहे. त्यांची भांडवली आणि बिगर भांडवली बांधकामे अशी वर्गवारी करणे आवश्यक आहे. बांधकामाबाबतचा तपशील (कामाच्या स्वरुपासह ) उपरोक्त विवरणपत्रातील रकाना क्र. ३ मध्ये व बिगर भांडवली म्हणजे वेतन, दूरध्वनी वीज पाणी शुल्क

कार्यालयीन खर्च, यंत्रसामुग्री तसेच सामुग्री व पुरवठा इ.यांची खरेदी याबाबतची सविस्तर माहिती रकाना क्र.४ मध्ये देण्यात यावी.

**सदर योजनातर्गत तरतूदीमधून विद्यार्थ्यांची निगडीत साहित्याचा समावेश राहील याची दक्षता घ्यावी. यापूर्वी निर्लेखित केलेल्या साहित्याच्या जागी आवश्यक खरेदी करावयाच्या साहित्यांचा प्राधान्याने विचार करावा. प्रयोगशाळेमधील रसायने व सामुग्रीची निकड लक्षात घेवून वार्षिक योजनेमध्ये प्रस्तावित करावी.**

२. सन २०१५-१६ मध्ये जी बांधकामे करावयाची आहेत त्यांच्यासाठी संस्थेत जागा उपलब्ध आहे काय ? असल्यास जे बांधकाम प्रस्तावित केलेले आहे त्यांची आवश्यकता, तसेच सदर बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नकाशे व अदांजपत्रके मिळण्याबाबतची केलेली कार्यवाही पुर्ण झालेली आहे काय ?

३. सन २०१४-१५ सुरु असलेली जी भांडवली कामे सन २०१५-१६ मध्ये सुरु ठेवणे आवश्यक आहे त्यांचा संपुर्ण तपशील सादर करणे आवश्यक आहे. म्हणजेच उक्त कामासाठी किती रकमेस प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे त्यापैकी आतापर्यत किती खर्च झालेला आहे. अदयापपावेतो सदर कामासाठी किती रक्कम देणे बाकी आहे. यांचा तपशील सादर करावा.यामध्ये सदर कामासाठी सन २०१४-१५ मध्ये अर्थसकल्पित करण्यात आलेले निधी विचारात घेवून सन २०१५-१६ साठी किती तरतूदीची आवश्यकता आहे. याबाबत अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून लेखी स्वरुपात माहिती घेवून ती सादर करण्यात यावी. बांधकामासाठी आवश्यक असणारा निधीची माहिती सादर करण्याबाबत आपणास माहे एप्रिल., जून २०१४ मध्ये पत्रान्वये कळविण्यात आलेले असून अदयापही माहिती सादर केलेली नाही.

४. सन २०१५-१६ या आथिक वर्षामध्ये आपले महाविद्यालयासाठी जिल्हा नियोजन व विकास मंडळाने तरतूद उपलब्ध करून दिलेली आहे काय ? असल्यास ती भांडवली / बिगर भांडवली कामासाठी तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे काय ? बिगर भांडवली कामासाठी जी तरतूद आपण प्रस्तावित केलेली आहे. सदरच्या तरतूदीतून कोणत्या वस्तू / बाबींची खरेदी करणार आहेत. त्याची तपशीलवार यादी किंमतीसह सादर करावी. तसेच सदरहू वस्तू आपले महाविद्यालयामध्ये/संस्थेमध्ये यापूर्वी खरेदी करण्यात आलेली आहे कसे याबाबतची माहिती देण्यात यावी. (जिल्हा नियोजन व विकास मंडळ यांची माहिती उपरोक्त विवरणपत्रामध्ये स्वंतत्रपणे देण्यात यावी.)

५. बिगर भांडवली बाबीमंधून ज्या वस्तूंची/बाबींची खरेदी करण्यात येणार आहे.त्यांचा सपूर्ण तपशील विवरणपत्रामध्ये सादर करणे आवश्यक आहे.

६. विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांच्या कार्य क्षेत्रातील अकृषि विद्यापीठांतील विकासकामाकरीता सन २०१५-१६ साठी किती निधीची आवश्यकता आहे. या निधीमधून कोणती नवीन विकास कामे प्रस्तावित करावयाची आहेत. यांचा तपशीलवार प्रकल्प अहवाल (DPR) संबधित विद्यापीठाकडून घेवून सादर करावा. विद्यापीठांच्या

विकास कामासाठी यापूर्वी प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे, अंशतः निधी प्राप्त झालेला आहे. मात्र विकास कामास अदयाप सुरुवात झालेली नाही. परिणामी शासनाकडून यापूर्वी देण्यात आलेला निधी अखर्चित आहे. अशा कामासाठी निधी प्रस्तावित करण्यात येवू नये. ज्या कामांना शासनाने यापूर्वी प्रदान केलेली आहे तरी कामे पुर्ण होण्याच्या दृष्टीने प्राधान्याने विचार करण्यात यावा.

उपरोक्त माहिती वर नमुद केलेल्या विहित कालावधीत सादर बधंनकारक आहे. विहित कालावधीत माहिती अप्राप्त असल्यास आपल्या मागणीबाबत शासनास प्रस्तावित न झाल्यास प्रस्तुत विषयाची **जबाबदारी आपणावर राहील याची कृपया नोंद घ्यावी.**

6/9/2014

**( डॉ. प्र. रा गायकवाड )**
प्र. शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण )
महाराष्ट्र राज्य पुणे -१

प्रत

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय विस्तारभवन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर